# -: प्रश्नपत्रिका आराखडा :-

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण गुण | एकूण प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण (प्रत्येक विषयात किमान) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बौध्दिक क्षमता चाचणी Mental Ability Test | १०० | १०० | १२० मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | १०.३० ते १२.३० | ४०% (SC, ST व दिव्यांग ३२%) |
| विश्रांती | | | | | | |
| २ | शालेय क्षमता चाचणी Scholastic Aptitude Test | १०० | १०० | १२० मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | १३.३० ते १५.३० | ४०% (SC, ST व दिव्यांग ३२%) |

**अ) पेपर - १ ला :- बौध्दिक क्षमता चाचणी (MAT)**

हीमानसशास्त्रीय चाचणी असून, त्यामध्ये कार्यकारणभाव, विश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित १०० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतील. (एकूण १०० गुण)

**ब) पेपर - २ रा :- शालेय क्षमता चाचणी**

ही सामान्यत: ९ वी व १० वीच्या अभ्यासक्रमांवर आधारित असेल. त्यामध्ये १) सामान्य विज्ञान २) समाजशास्त्र ३) गणित असे तीन विषय असतील. या तीन विषयांचे एकूण १०० प्रश्न सोडवायचे असतात.

सामान्य विज्ञान ४० गुण + समाजशास्त्र ४० गुण + गणित व भूमिती २० गुण = एकूण १०० गुण

- **उपविषयावर गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.**

a) सामान्य विज्ञान ४० गुण :- भौतिकशास्त्र १३ गुण, रसायनशास्त्र १३ गुण व जीवशास्त्र १४ गुण.
b) सामाजिक शास्त्र ४० गुण :- इतिहास १६ गुण, राज्यशास्त्र ०८ गुण व भूगोल १६ गुण.
c) गणित २० गुण :- बिजगणित १० गुण व भूमिती १० गुण.

१) **माध्यम:-** प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दु, कन्नड व तेलुगू या सात माध्यमातून उपलब्ध असतील. (सर्व विद्यार्थ्यांना मूळ माध्यमाबरोबर इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका एकत्र देण्यात येणार आहे.) यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येईल. प्रश्नपत्रिकेत काही शंका निर्माण झाल्यास इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका मूळ प्रत म्हणून पहावी. दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिल्या जातील. प्रत्येक प्रश्नक्रमांकापुढे पर्यायांसाठी ४ वर्तुळे असतील. योग्य पर्यायाचे वर्तुळ काळे/निळे बॉलपेपने पूर्णत: रंगवून उत्तर नोंदवायचे आहे. पेन्सिलचा वापर केलेली व अपुरी वर्तुळ गोल केलेले उत्तरे यांना गुण दिले जाणार नाहीत. एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, व्हाईटनर/खाडाखोड करुन नोंदविलेली किंवा गिरवलेली उत्तरे यांना गुण दिले जाणार नाहीत.

२) **परीक्षेचे मूल्यमापन:-** विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकामार्फत OMR पध्दतीने करण्यात येते. खबरदारीचे सर्व उपाय योजून बिनचूक गुणयादी तयार करण्यात येते. गत वर्षी राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी NCERT नवी दिल्ली यांचेकडून महाराष्ट्रासाठी एकूण ७७४ एवढा कोटा देण्यात आलेला होता. गत वर्षापासून उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन करताना वजा गुण (Negative Marking) पध्दतीचा अवलंब राज्यस्तर व राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी केला जात नाही.

३) **पात्रता गुण :-** MAT व SAT विषयासाठी प्रत्येक विषयात General संवर्गासाठी ४०% गुण व SC, ST व दिव्यांगासाठी ३२% गुण आवश्यक आहेत.